# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 22/07/2023 (शनिवार) दुपार

## दुखापत

१) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील सावरमेंढा येथे दिनांक १९/०७/२०२३ चे सायंकाळी ०७/३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. वनिता मनोज शेंडे, वय ३५ वर्ष, रा. सावरमेंढा ता. सावनेर जि. नागपुर ही मेयो हॉस्पीटल नागपुरला पतीचे औषध आणण्याकरिता गेली होती व परत सायंकाळी घरी परत आली तर फिर्यादीचे पती आरोपी नामे– मनोज शेंडे, रा. सावरमेंढा ता. सावनेर म्हणाले की, तु नागपुर वरून इतक्या उशिरा का आली असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळी करून तिचे डावे हाताचे मनगटावर काडी काठीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे पो.स्टे ब. नं. ४३६ सावनेर मो. नं. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कुही :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा कुही टाउन येथे दिनांक २१/०७/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुण्यवान श्रिराम पाटील, वय ५३ वर्ष, रा. भिमनगर कुही यांच्या घरातील तेलाच्या डब्यातील तेल कमी दिसल्याने ते घरासमोर थांबुन बडबड करीत असतांना घराशेजारी राहणारा **आरोपी नामे– भिमराव सत्यवान पाटील वय ३५ वर्ष रा. कुही** हा म्हणाला की मला चोर म्हणत आहेस का असे म्हणुन वादविवाद करून बांबूच्या काठीने फिर्यादीच्या डोक्याला, पाठीला व डाव्या हाताचे भुजेला मार लागुन रक्त निघाल्याने तसेच हाताबुक्क्यांनी मारल्याने मानेवर व्रण आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ७५३ ताजणे मो. क्र. ९८२२७१४०५३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर